# " BEST DETECTION OF THE MONTH-August 2019 "

दिनांक **१०/१०/२०१९** रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या हस्ते भरूचा सभाग्रह, सहावा मजला, नविन पोलीस आयुक्त इमारत, पोलीस आयुक्त कार्यालय मुंबई येथे आयोजीत करण्यात आलेल्या गुन्हे परिषदेत बक्षिस वितरण कार्यक्रमात सोबत जोडण्यात आलेल्या **माहे ऑगस्ट —२०१९** या महिन्याचा **" BEST DETECTION OF THE MONTH "** चा पुरस्कार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | **दादर पोलीस ठाणे** | **गु.र.क्र.२२७/२०१९, कलम ३६४(अ), १७०, ३८४, १२० (ब) भादवि सह ३,२५ भाहका.** |

**‘‘लोकसेवक अशी बतावणी करून अपहरण करुन खंडणी मागणे’’**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** दिनांक— २०/०८/१९ रोजी अज्ञात इसमांनी आयकर विभागाचे अधिकारी असल्याचे भासवुन व आपआपसात कट रचुन खंडीणीसाठी अपहरण करून शस्त्राचा धाक दाखवून खंडणीची रक्कम रोख रुपये ३५,००,०००/— स्विकारली म्हणुन दिनांक २६/०८/२०१९ रोजी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून नमुद गुन्हा हा दाखल करण्यात आलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री. सैय्यद मुंतजीर मेहदी, वय—६३ वर्षे, |
| **बळीत/मयत** | :— | श्री. सैय्यद मुंतजीर मेहदी, वय—६३ वर्षे, |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | १) संतोष वसंत पाटील हिं/२६ वर्ष,<br>२) मोहंमद इलियास अस्लम बागवान मु/२४ वर्ष,<br>३) एकनाथ बाळु चव्हाण, वय २९ वर्षे,<br>४) पांडुरंग भिकाजी बोटे, हिं/२९ वर्षे,<br>५) अजित सदाशिव पाटील, हिं/३२ वर्षे,<br>६) नरेश कृष्णा गुरव हिं/२३ वर्ष,<br>७) सुभाष रामचंद्र गवस हिं/४० वर्ष,<br>आरोपी क्र. १ ते ६ दि. २८/०८/१९ रोजी अटक<br>आरोपी क्र. ७ दि. ३१/०८/१९ रोजी अटक. |
| **हस्तगत मालमत्ता** | | १) अटक आरोपी अजित सदाशिव पाटील याचेकडून रू १३,००,०००/— रोख रक्कम हस्तगत केली आहे.<br>२) अटक आरोपी पांडुरंग भिकाजी बोटे यांचेकडून नमुद गुन्हयातील १३,५०,०००/— रोख रक्कम हस्तगत केली आहे.<br>३) अटक आरोपी नरेश कृष्णा गुरव याचेकडून नमूद गुन्हयातील २५,०००/— रोख रक्कम हस्तगत केली आहे.<br>...........................................................................................<br>**खंडणीतील हस्तगत एकुण रक्कम २६,७५,०००/— रू**<br>३) अंदाजे २०,०००/— रू किं. एक काळया रंगाचे तपकिरी रंगाची मुठ असलेले स्वदेशी बनावटीचे पिस्टल |

| | | |
|---|---|---|
| | | ४) अंदाजे १००/— रू किं. एक जिवंत काडतुस<br>५) गुन्हयात वापरलेली अंदाजे १,३०,०००/— रू किं. टाटा कंपनीची इंडीगो टी.डी.आय कार क्र. एम.एच ४३ आर ६३८४. |

**<u>तपास कौशल्य</u>** :— नमुद गुन्हा हा नोंद झाल्यानंतर फिर्यादी यांना अपहरण केलेल्या घटनास्थळी रजिस्ट्रार ऑफीसच्या गेटच्या समोर, एम.टी.एन.एल ऑफीसजवळ, प्रभादेवी, मुंबई येथे घेवून जावून त्या ठिकाणाहून डम डेटा (सेल आयडी) प्राप्त करण्यात आला. त्यानंतर फिर्यादी यांचे कार्यालयामध्ये कामकाजासाठी असलेले सर्व कर्मचारी यांचे मो.नं. फिर्यादी यांचेकडून प्राप्त करण्यात आले. सदरची सर्व माहीती घेतल्यानंतर तांत्रिक माहितीवरून मा. वरिष्ठांच्या परवानगीने व मार्गदर्शनाखाली मध्य प्रादेशिक विभाग, सायबर सेलचे पोउपनि कदम, धारावी पोलीस ठाणेचे पोउपनि माळी, दादर पोलीस ठाणेचे पो.उप.नि धनंजय पाटील, पो.ह.क्र. १५८३८/अडसुळ तसेच पो.शि.क्र.०८०५६९/आंधळे हे पथकाने फिर्यादीसह त्यांना अपहरण करून ज्या मार्गाने कोल्हापुर येथे नेण्यात आले होते. त्यामार्गाने त्यांनी सांगितल्याप्रमाणे वाहनाचे मार्गक्रमण चालू ठेवले. दरम्यान फिर्यादी यांना विश्वासात घेवून त्यांच्या मनातील भिती दुर करून त्यांना शांतपणे विचार करण्यास सांगून ज्या ज्या ठिकाणी अपहरण करणारे आरोपींनी वाहने थांबविली होती ती सर्व ठिकाणे दाखवण्यास सांगितले. त्यांनतर पुणे शहरात प्रवेश करणेआधी रावेत कडे वळण घेतलेलया रस्त्याच्या बाजूला असलेले विठ्ठल हॉटेल या ठिकाणी फिर्यादी यांनी गाडी थांबविण्यास सांगितली. सदर ठिकाणी त्यांना हॉटेलमध्ये जावून जेवण दिल्याचे सांगितले. सदर ठिकाणाचे देखील सेल आयडी घेण्यात आले. त्याचप्रमाणे सदर रस्त्याच्या विरूध्द वाहीनीवर हॉटेल कृष्णाच्या समोरील पार्कींगमध्ये रस्त्याच्या कडेला आरोपीतांना खंडणीची रक्कम दिल्याचे फिर्यादीने सांगितले. सदर ठिकाणी कुठल्याही प्रकारचे सी.सी.टि.व्हि.कॅमेरे अढळून आले नाही. त्यानंतर फिर्यादीने सांगितल्याप्रमाणे विरूध्द दिशेने सर्व्हिस रोडने पुढे जावून एका ठिकाणी अपहरण कर्त्यापैकी एका आरोपीने खाली उतरून मोबाईलवर संभाषण केल्याचे सांगितले होते. सदर ठिकाणचे देखील सेल आयडी घेण्यात आले. त्यानंतर सदर ठिकाणाहून वाहनाने सरळ पुणे कात्रज मार्गे सातारा येथे आलो. सातारा या ठिकाणी आलो असता फिर्यादीने सांगितले की, त्यांना आरोपीतांनी अपहरण केले त्या दिवशी एका लॉजवर मुक्कामासाठी ठेवले होते. तो लॉज सातारा शहराच्या जवळपास असून सदर लॉजचे नाव व पत्ता तसेच रस्ता त्यांना ते वयस्कर असल्याने आठवत नाही. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी आठवून सांगितले की, ते रात्रीच्या वेळी ज्या रस्त्याने जात होते तो रस्ता एका उडड्‌णपुलाखालून जात असून सदरचे लॉजकडे जाण्यासाठीच्या रस्त्यावर मोठया प्रमाणात झाडे आहे. आणि शहरापासून काही अंतरावर आहे. तसेच लोकवस्ती विरळ आहे. त्याप्रमाणे आम्ही सातारा शहारातील बरेच रस्त्यांनी फिर्यादी यांना वाहनाने फिरवले.व सातारा शहराच्या आजुबाजुच्या रस्त्याची माहीती दिली. फिर्यादी यांना आम्ही महाबळेश्वर रोडने घेवून जावून एका लॉजजवळ सकाळी ०५.०० वाजेच्या दरम्यान नेले असता त्यांनी लॉज ओळखला. सदर वेळी लॉजचा दरवाजा बंद होता. तेव्हा आम्ही डोअर बेल, लॅडलाईन फोनचा वापर केला परंतू लॉज मालकाने लॉजचा दरवाजा उघडला नाही. परंतू आम्ही त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधला असता त्याने दरवाजा उघडला. त्यावेळी आम्ही त्यांना आमची ओळख सांगितले. तसेच फिर्यादी यांना देखील लॉजच्या मालकाने ओळखले तेव्हा आरोपींनी फिर्यादी यांना दिलेला रूम घेण्यासाठी दिलेले कागदपत्र तसेच रजिसटर तपासले असता आम्हाला त्या ठिकाणी निलेश पांडुरंग नाईक नावाचे ड्रायव्हींग लायसन्सची छायाकिंत प्रत आरोपीतांनी सादर केलेली मिळाली. तसेच सदर ठिकाणी ८८५७८६६५८८ असा मोबाईल नं. प्राप्त झाला. परंतू सदरचा मोबाईल नं. हा फेक असल्याचे निष्पन्न झाले त्यावेळी सदर ठिकाणचे देखील सेल आयडी घेण्यात आले. आम्ही सदर ठिकाणचे सी.सी.टि.व्ही.फुटेज स्पष्ट दिसत नसल्याने सदर ठिकाणाहून डिव्हिआर ताब्यात घेतला. लॉज मालकाकडे आरोपीच्या वर्णनाबाबत तसेच वेगवेगळया मार्गाने तपास करत असतांना तुम्हाला फिर्यादी यांना रेस्टॉरंट मध्ये ठेवतेवेळी कोणी मोबाईलवरून संपर्क साधला होता का? असे विचारले असता त्याने त्यांच्या मोबाईलमधील एक मोबाईल नंबर आम्हाला दिला. तेव्हा आम्ही मुंबईमध्ये फिर्यादी यांना ताब्यात घेतलेले ठिकाणच्या डम्प डेटामध्ये आलेला मो. नं. आणि लॉज मालकाने दिलेला मो.नं. एकच असल्याने सदरच्या मोबाईल नंबरवरून केलेले कॉल तसेच

आलेले कॉल यांचे सी.डी.आर., एस.डी.आर काढून तांत्रिक पध्दतीने सदर मोबाईल नं. लोकेशन प्राप्त केले. त्यानंतर आम्ही कोल्हापुर स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने संशयीत इसमांचे लोकेशन च्या ठिकाणी गडहिंग्लंज या ठिकाणी रवाना झालो. त्या परिसरातुन ५ संशयीत इसमांना ताब्यात घेवून त्यांना चौकशीकामी दादर पोलीस ठाणे येथे आणले. तसेच सपोनि पानसरे व गुन्हे प्रकटीकरण पथकाने मुंबईत १ संशयीत इसम नामे नरेश कृष्णा गुरव यास गुप्त बातमीदाराच्या मदतीने त्याचे राहते परीसरातुन ताब्यात घेवून नमुद गुन्हयासंदर्भात त्यांचेकडे सखोल चौकशी केली असता सदरचा गुन्हा हा त्यांनी केल्याची खात्री झाल्याने वर नमुद ६ आरोपीतांना दि. २८/०८/२०१९ रोजी अटक करण्यात आली आहे. नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे सुभाष रामचंद्र गवस याचा कोल्हापुर येथील राहाते परीसरात मोबाईल नंबरच्या तांत्रिक माहितीवरून व गुप्त बातमीदाराच्या मदतीने शोध घेतला असता सदरचा आरोपी मिळून आल्याने त्यास दि. ३१/०८/१९ रोजी नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

- तपासात असे निष्पन्न झाले आहे की, सदर गुन्हा हा फिर्यादीचा पुर्वीचा चालक एकनाथ बाळू चव्हाण याने फिर्यादी यांचेकडे कामाला असलेला नरेश कृष्णा गुरव याचेकडून माहीती मिळवून फिर्यादी यांचे अपहरण करून त्याला ते इन्कम टॅक्स ऑफीसर आहे असे धमकावून खोटे सांगून त्यांचेकडून त्यास इन्कम टॅक्स चे कचाटयातून सोडणे कामी ३५,००,०००/— रूपयाची खंडणी घेतली होती.

- सदरचा संवेदनशील गुन्हा उघड झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी माहे ऑगस्ट —**२०१९** चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

- **दादर पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | हुदद्या | अधिकारी/कर्मचा—याचे नाव |
|---|---|---|
| १ | स.पो.आ. | सुनिल सहदेव गांवकर |
| २ | व.पो.नि | दिवाकर भास्कर शेळके |
| ३ | पो.नि | विजय विष्णु कदम |
| ४ | सपोनि | वैभव नामदेव पानसरे |
| ५ | पोउनि | रामदास तात्याबा कदम |
| ६ | पोउनि | अमोल महादेव माळी |
| ७ | पोउनि | धंनजय नथ्थु पाटील |
| ८ | पो.ह. १५८३८ | शामराव गणपत अडसुळ |
| ९ | पो.शि.०८०५६९ | भाऊसाहेब रमेश आंधळे |